# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

२६ जुन, २०२०



☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍ : 7447744100 (PRO)


# अंमली पदार्थ विरोधी दिनी चंद्रपुर जिल्हयातील विविध गुन्हयामधील ७९.६७५ किलो ग्रॅम गांजा नष्ट

२६ जून हा जागतीक अंमली पदार्थ विरोधी दिन म्हणुन संयुक्त राष्ट्रसंघाने आंतराष्ट्रीय स्तरावर घोषीत केलेला असुन शाळा, महाविदयालये, झोपडपट्टी इत्यादी ठिकाणी अंमली पदार्थाच्या सेवनाने मनुष्याच्या शरिरावर होणारे दुष्परिणाम याबाबत सतत ७ दिवस जनजागृती कार्यक्रम राबविण्याकरिता जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन प्रमुखांना निर्देश दिले.

आज दिनांक २६ जुन २०२० रोजी डॉ. महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. शेखर देशमुख, पोलीस उपअधीक्षक (गृह), चंद्रपुर, श्री. स्वप्नील जाधव उपविभागीय पोलीस अधिकारी राजुरा, श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपुर, श्री. भगत, पोलीस निरीक्षक बल्लारशाह व संबंधीत पोलीस कर्मचारी यांचे उपस्थितीत मा. न्यायालयाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे पोलीस स्टेशन बल्लारशाह येथील २ गुन्हयातील ७९ किलो ६७५ ग्रॅम ओलसर गांजा पोलीस मुख्यालय चंद्रपुर येथील परेड ग्राउंडवर अंमली पदार्थाची विल्हेवाट करण्याच्या कार्यपध्दतीची अंमलबजावणी करून नाश करण्यात आला.

---